आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

नाशिक आणि अहिल्यानगरमधील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्याचा आढावा घेणारी **'रायझिंग स्टार अवॉर्ड २०२५'** चार पानी विशेष पुरवणी आजच्या अंकासोबत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३२२ । मंगळवार, दि. २९ जुलै २०२५ । पाने १२+४ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय
## विद्यार्थी सुरक्षेचे आव्हान

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील दुर्दैवी घटनेनंतर शासनाला पुन्हा जाग आली आहे. विद्यार्थी सुरक्षेच्या उपाययोजना आणि सुविधांचे लेखापरीक्षण करण्याचा आदेश केंद्र आणि राज्य सरकारने नुकताच दिला. दोन्ही आदेशांचा उद्देश एकच असला तरी राज्य सरकारचा आदेश दुर्दैवी घटनेआधी दिला गेला होता एवढाच काय तो फरक! झालावाड घटनेत काही विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अशा मृत्यूंचे पाप निःसंशय सरकारचेच असते. कारण सरकारच्या बहुसंख्य आदेशांचे घोडे नेहमीच वरातीमागून धावते. याची कितीतरी उदाहरणे देता येतील. गच्चीवरची रेस्टारंट्स, विविध आस्थापनांच्या इमारती, जुने पूल, रुग्णालयांचे आगप्रतिबंधक उपाय आदींचे लेखापरीक्षण करण्याचे आदेश सरकारे देतात खरी, पण त्यासाठीसुद्धा एखादी दुर्दैवी घटना घडावी लागते. घटना घडल्यावर सरकारी यंत्रणा जाग्या होतात. घोषणा आणि भेटींचा पाऊस पडतो. लेखापरीक्षण ही त्यापैकीच एक घोषणा! सरकारी प्रशासनाच्या ती इतकी अंगवळणी पडली असेल की, आदेशात फक्त घटनेच्या ठिकाणाचा बदल करावा लागण्याइतकेच कष्ट त्यांना घ्यावे लागत असतील. जनक्षोभ आणि सामाजिक वातावरण शांत झाले की, प्रशासन पुन्हा कासवगती धारण करते. आजवर कितीतरी लेखापरीक्षणे पार पडली असतील? त्यांचे निष्कर्ष काय आले? त्यावर सरकारने कोणत्या उपाययोजना केल्या? या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी लेखापरीक्षणे पार पडावी लागतात. ती तशी पार पडतात का? विशेषतः ग्रामीण भागातील सरकारी शाळांच्या इमारतींची अवस्था सरकारला माहीत नसते का? नाशिक जिल्ह्यातील अनेक शाळांच्या इमारती पडक्या व गळक्या आहेत. त्याबाबतच्या बातम्या प्रसार माध्यमांतून अधूनमधून प्रसिद्ध होतात. शाळेची भिंत किंवा छत फक्त झालावाड जिल्ह्यातच कोसळले का? राज्याच्या गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात साईटोला येथील शाळा इमारतीच्या स्लॅबचा काही भाग नुकताच कोसळला. त्यात काही विद्यार्थी जखमी झाले अशा घटनांच्या मुद्यावरून विधानसभेत प्रश्नोत्तरे झडतात. फक्त त्यापुढे मात्र काहीच घडत नाही, हा खरा कळीचा मुद्दा आहे. इमारतींच्या दुरवस्थेसह स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था याही समस्या आढळतात. स्वच्छतागृहांची स्वच्छता नेहमी दुर्लक्षित राहते. अनेक दुर्गम गावांत शाळेत जाण्यासाठी रस्ते, ओढे आणि नाल्यांवर छोटे पूल नसतात. विद्यार्थी सुरक्षा हा गंभीर चर्चेचा वेगळा मुद्दा आहे. सरकारी शाळांमध्ये सीबीएसई पद्धतीचे शिक्षण देणार असल्याची घोषणा सरकारने केली आहे. शिक्षणपद्धती काळानुरूप बदलायला हवीच, पण त्यासाठी आधी शाळा इमारती चांगल्या, सुविधायुक्त आणि सुरक्षित नकोत का? शाळा महाराष्ट्रातील असोत वा राजस्थानमधील; त्यांच्या इमारतींच्या दुरवस्थेचे दुखणे सारखेच आहे.

**तापमान**

| | | |
|---|---|---|
| किमान | : | २१.८° |
| कमाल | : | २५.४° |

◉ 'देशदूत' - 'सार्वमत'चा पहिला 'रायझिंग स्टार अवॉर्ड' दा नांग सिटी, व्हिएतनाम येथे सोमवारी सायंकाळी एका रंगारंग कार्यक्रमात दिला गेला. व्हिएतनाम टुरिझम प्रमोशन सेंटरच्या उपसंचालक मिस माई थी तनहाय यांच्या हस्ते चौदा मान्यवरांना गौरविण्यात आले. त्यांचा सत्कार करताना महाव्यवस्थापक अमोल घावरे व सल्लागार संपादक शैलेंद्र तनपुरे.

# 'देशदूत' - 'सार्वमत'चा उपक्रम स्तुत्य

## 'टुरिझम'च्या उपसंचालक मिस तनहाय यांचे गौरवोद्गार

- व्हिएतनाममध्ये 'रायझिंग स्टार अवॉर्ड' प्रदान
- नाशिक, अहिल्यानगरच्या चौदा उद्यमींचा सन्मान

**दा नांग सिटी, व्हिएतनाम । विशेष प्रतिनिधी**

भारतातील गुणवंत उद्योजकांचा सत्कार व्हिएतनाममध्ये होत असल्याने देशातील उद्योगांना प्रोत्साहन मिळणार आहे. व्हिएतनामला येऊन 'रायझिंग स्टार अवॉर्ड' देण्याचा 'देशदूत' - 'सार्वमत' दैनिकांचा उपक्रम स्तुत्य तर आहेच पण आमच्या देशाला सर्वप्रथम हा मान दिल्याबद्दल मी 'देशदूत' माध्यम समूहाचे विशेष आभार मानते, असे गौरवोद्गार व्हिएतनामच्या टुरिझम प्रमोशन सेंटरच्या उपसंचालक मिस माई थी तनहाय यांनी काढले.

'देशदूत' - 'सार्वमत'तर्फे दिला जाणारा पहिला 'रायझिंग स्टार अवॉर्ड' सोहळा सोमवारी सायंकाळी दा नांगच्या समुद्रकिनारी असलेल्या नझारे हॉटेलमध्ये अत्यंत उत्साहात पार पडला. त्याप्रसंगी मिस तनहाय बोलत होत्या. भारत व व्हिएतनाम या दोन्ही देशात सध्या पर्यटनामुळे उत्तम संबंध प्रस्थापित झाले असून मुंबई, अहमदाबाद आदी शहरांमधून आता येथील महत्वाच्या शहरांमध्ये दररोज थेट विमानसेवा सुरु झाली असल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले.

मिस तनहाय यांच्या हस्ते चौदा जणांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी खास कार्यक्रमासाठी अनेक नाशिककर आवर्जून उपस्थित होते. प्रास्ताविक 'देशदूत'चे जाहिरात महाव्यवस्थापक अमोल घावरे यांनी केले. सूत्रसंचालन व पाहुण्यांचा सत्कार सल्लागार संपादक शैलेंद्र तनपुरे यांनी केला. सहायक जाहिरात महाव्यवस्थापक (ग्रामीण) सचिन कापडणी यांनी आभार मानले.

**यांचा झाला गौरव**

- अॅड. डॉ. वैभव शेटे, नाशिक
- डॉ. नीलेश निकम, नाशिक
- शंकरराव वाघ, निफाड
- जयेश मेहता, मुंबई
- सुनील पाटील, दिंडोरी
- अमोल देशमुख, दिंडोरी
- सोमनाथ सोनवणे, दिंडोरी
- प्रतीक क्षत्रिय, सिन्नर
- अक्षय रमेश वडनेरे, नाशिक
- अथर्व चिंतामणी, नाशिक
- श्रीरंग खुळे, सिन्नर
- वीरेंद्र नानासाहेब थोरात, अकोले, अहिल्यानगर
- रावसाहेब वाकचौरे, अकोले, अहिल्यानगर.
- गणेश सोपान मैड, लोणी, अहिल्यानगर

कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तांत दि. १ ऑगस्टच्या अंकात प्रसिद्ध होईल

# 'सिंदूर'वरून संसदेत रणकंदन

## चर्चेला सुरुवात; अनेक मुद्यांवरून सरकार विरोधकांच्या कात्रीत

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

संसदेच्या अधिवेशनात पहिल्या दिवसापासूनच 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चेसाठी विरोधक आक्रमक होते. अखेर सरकारने चर्चेला तयारी दाखवली आणि आजपासून चर्चा सुरू झाली. 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी होत असताना सरकारने ते अचानक का थांबवले, भारताचे किती जेट पडले आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीचा दावा किती खरा आहे, अशा प्रश्नांचा विरोधकांकडून सरकारवर भडीमार सुरू होता. त्यावर सरकारने आज उत्तर देण्याचा प्रयत्न केला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'ऑपरेशन सिंदूर' अजून थांबवले नसल्याचा पुनरुच्चार करत सरकारची बाजू मांडतांना विरोधकांचे सर्व आरोप फेटाळून लावले.परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीचा दावा फेटाळून लावला. पान १० वर

> पहलगाम, 'ऑपरेशन सिंदूर' आणि परराष्ट्र धोरणाबद्दल सत्य बाहेर आले पाहिजे. राजनाथ सिंह यांनी बरीच माहिती दिली, परंतु पहलगाममधील बैसरणमध्ये दहशतवादी कसे घुसले? हे त्यांनी सांगितले नाही. देशातील लोकांना हेदेखील जाणून घ्यायचे आहे की, शंभर दिवस उलटून गेले, पण सरकार अजून त्यांना का पकडू शकले नाही? शंभर दिवसांनंतरही सरकारकडे याचे उत्तर नाही.
>
> ■ **गौरव गोगोई**, काँग्रेस

> आम्ही ढोल सैन्याच्या शौर्याचे वाजवू, पंतप्रधानांचे वाजवणार नाही. पाकिस्तानने विनवणी केली म्हणून युद्धविराम केला गेला, असे आताही सांगितले गेले. मग बिनशर्त युद्धविराम का केला? जर पाकिस्तान शरण येत होता तर तुम्ही बिनशर्त युद्धविराम का स्वीकारला?
>
> ■ **अरविंद सावंत**, शिवसेना ठाकरे गट

> पाकिस्तानातून दहशतवादी येऊन आमच्या लोकांना मारतात आणि आपण त्याच देशाशी क्रिकेट खेळतो? असा क्रिकेटचा सामना पाहण्याची परवानगी माझा आत्मा मला देत नाही. तुम्ही पाकिस्तानसोबत व्यापार बंद केलात, मग खेळात मैत्री कुठून आली?
>
> ■ **असदुद्दीन ओवैसी**, खासदार, एमआयएम

### पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाईंड हाशिम मुसाचा खात्मा

जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगरमधील दाचिगम राष्ट्रीय उद्यानाजवळील हरवन भागात सोमवारी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन पाकिस्तानी दहशतवादी ठार झाले. यामध्ये पहलगाम हल्ल्यातील मुख्य आरोपी हाशिम मुसा याचा समावेश आहे. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या ९७ दिवसांनंतर अखेर भारतीय सैन्याला मोठे यश मिळाले आहे. 'ऑपरेशन महादेव' अंतर्गत भारतीय सैन्याने प्रत्युत्तरात्मक कारवाई करत तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. ही चकमक सोमवारी श्रीनगरमधील लिडवास परिसरात झाली. याबाबत चिनार कॉर्प्सने माहिती दिली असून, ही कारवाई पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी नेटवर्कविरोधात करण्यात आल्याचे सांगितले. चकमकीनंतर दहशतवाद्यांकडून अमेरिकन ४ कार्बाइन, -४७ रायफल, १७ रायफल ग्रेनेड आणि इतर संशयास्पद सामग्री जप्त करण्यात आली आहे.

# जिल्ह्यातील नऊ धरणे ओसंडली

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या मुसळधारेमुळे धरणसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १४ धरणांतून सध्या विसर्ग सुरू असून, धरण समूहात ७७ टक्के तर गंगापूर धरण समूहात ८४ टक्के पाणी साठा आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील धरणांतून जायकवाडीच्या नाथसागर धरणाकडे ३६ टीएमसी पाणी रवाना झाले आहे.

जिल्ह्यात संततधारेमुळे आळंदी, वाघाड, भावली, वालदेवी, नांदूरमध्यमेश्वर, भाम, भोजापूर, हरणबारी व केळझर ही नऊ धरणे ओव्हरफ्लो झाली आहेत. या धरणांतून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्याचवेळी जिल्ह्यातील काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य दिसून येत आहे. नांदगाव, मालेगाव व बागलाण या तालुक्यांतील ३६ गाव व खेड्यांतील २३ हजार ८०३ लोकसंख्येसाठी दहा टँकरद्वारे १८ फेऱ्या सुरू आहेत. उर्वरित १२ तालुके टँकरमुक्त झाले आहेत.

नाशिक जिल्ह्यात झालेल्या मुसळधारेमुळे धरणांतून मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्यात येत आहे. आतापर्यंत नाशिक जिल्ह्यातून जायकवाडी धरणाकडे ४,२६,१४० क्यूसेक म्हणजेच ३६,८३१ दलघफू (टीएमसी) पाण्याचा विसर्ग झाला आहे.

**धरणनिहाय विसर्ग**

| | | |
|---|---|---|
| दारणा ५२२२ | नांदूरमध्यमेश्वर १६५५२ | वालदेवी ४०७ |
| आळंदी ६८७ | होळकर पूल ११०० | भावली ७०१ |
| भाम २४०७ | वाकी ९२४ | कडवा २४५८ |
| वाघाड १५२७ | पुनेगाव ८४० | भोजापूर ३८ |
| गंगापूर ६०३ | पालखेड ७७२ | गौतमी गोदावरी ५२४ |

### 'कलंकित मंत्र्यांना बडतर्फ करा'

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारमधील कलंकित, भ्रष्टाचारी आणि असंवेदनशील मंत्री आणि आमदारांना बडतर्फ करावे, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाने सोमवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना भेटून केली. ठाकरे गटाचा रोख सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार संजय गायकवाड यांच्याकडे होता.

सरकारच या कलंकित मंत्र्यांना पाठीशी घालत आहे. त्यामुळे आम्ही राज्यपालांकडे न्याय मागण्यासाठी आलो आहोत. राज्यपाल आम्हाला न्याय देतील अशी आम्हाला अपेक्षा आहे, असे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपालांच्या भेटीनंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

## महाराष्ट्राची लेक चौसष्ट घरांची राणी!

◉ जॉर्जियामध्ये झालेल्या एफआयडीई महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत महाराष्ट्राची लेक दिव्या देशमुख हिने ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पी हिचा पराभव करत विश्वविजेतेपद पटकावले.

(सविस्तर शेवटच्या पानावर)

> फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा २०२५ जिंकणाऱ्या युवा दिव्या देशमुख हिचा अभिमान वाटतो. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिचे अभिनंदन, यामुळे युवावर्गाला प्रेरणा मिळेल. कोनेरू हम्पीने देखील संपूर्ण स्पर्धेत उत्तम कामगिरी करून दाखवली आहे. दोन्ही खेळाडूंना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा.
>
> - **नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

> महिला बुद्धिबळ विश्वचषकावर नाव कोरून ग्रॅण्ड मास्टर दिव्या देशमुख यांनी भारताची मान गौरवाने उंचावली आहे. विशेषतः महाराष्ट्राची पहिली ग्रॅण्ड मास्टर.. विश्वविजेती म्हणून महाराष्ट्राचे नाव बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय पटावरही सुवर्णाक्षरांनी नोंदवले आहे. या कामगिरीसाठी मनःपूर्वक अभिनंदन!
>
> - **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

# मनपाचा सायकल ट्रॅक आहे तरी कुठे?

## साडेतेरा कोटी खर्च तरी ना सायकल ना ट्रॅक; फक्त घाण

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र सरकारकडून मिळालेल्या निधीतून नाशिक महापालिकेने त्र्यंबक रोड परिसरात सुमारे दीड किलोमीटर लांबीचा सायकल ट्रॅक सुमारे १३.५ कोटी रुपये खर्चून उभारला होता. मात्र, सध्या या ट्रॅकचे अस्तित्वच लुप्त झाल्यासारखे झाले असून, तो ट्रॅक सापडणेही कठीण झाले आहे.

सध्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा, गवत आणि सिटीलिंकच्या बससह खासगी वाहनांचे पार्किंग सुरू असून, सायकल ट्रॅकची खूणदेखील कुठेच दिसत नाही. तसे पाहिले गेले तर हा ट्रॅक प्रत्यक्षात पान १० वर

सायकल चालवणाऱ्यांमुळे शहरात कार्बन फूटप्रिंट कमी होतो, त्यामुळे पर्यावरण रक्षणासाठी ही संस्कृती वाढवणे महत्वाचे आहे. शाळकरी विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुणाई, ज्येष्ठ नागरिक, महिलावर्ग आणि सर्वसामान्य नागरिक सायकल ट्रॅकचा वापर करतील. मात्र, तो ट्रॅक सुरक्षित, स्वच्छ आणि वापरायोग्य असला पाहिजे.

■ **अमित घुगे**, अध्यक्ष, नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन

नाशिककरांनी सायकल चालवून त्या ट्रॅकचा वापर करावा. या रस्त्याचा वापर भविष्यात वारकरी देखील करतील त्या दृष्टीने तो तयार करण्यात आला आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच हवेतील गुणवत्ता चांगली रहावी, म्हणून सायकल ट्रॅक महत्वाचा आहे.

■ **संजय अग्रवाल**, शहर अभियंता, मनपा

# मनमाड कृउबा सभापती गोगडांविरोधात अविश्वास

**मनमाड । प्रतिनिधी**

मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दीपक गोगड यांच्या विरोधात १७ पैकी १२ संचालकांनी आज (सोमवार) अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांच्याकडे अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आल्याची माहिती माजी सभापती संजय पवार, किशोर लहाने यांनी दिली. अविश्वास ठरावावर चर्चा करण्यासाठी येवल्याचे प्रांताधिकारी यांच्या उपस्थितीत विशेष सभा घेण्यात येणार असून, प्रांतधिकारी कोणत्या दिवशी सभा आयोजित करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

गेल्या दीड वर्षापासून बाजार समितीत सत्ताधारी आणि विरोधी गटात सत्तासंघर्ष सुरु असून त्याचे रूपांतर अविश्वास ठरावात झाले. काल विरोधी गटाचे गंगाधर बिडगर, संजय पवार, किशोर पान १० वर